**Application in prescribe pro are invited for the post of Law officer (Group- A) in the office of the Additional Director General of Police, Protection of Civil Rights, Maharashtra State, Mumbai on contract basis on the establishment of the Additional Director General of Police, Protection of Civil Rights, Maharashtra State, Mumbai**

---

**Advt. No. DGP/PCR/Table No. 1/L O RECRUTEMENT PROCESS/47/2022 Mumbai date. 22/09/2022.**

Below mentioned post of law officer (Group-A) is to be filled up on contract basis for eleven (11) months, on the establishment of the Additional Director General of Police, Protection of Civil Rights, Maharashtra State, Mumbai.

**Law Officer "Group A" ( Total Post- 1)**

| Sr. no. | Office Name | Vacant Post |
|---|---|---|
| 1 | Additional Director General of Police, Protection of Civil Rights, Maharashtra State, Mumbai. | 01 |

Candidates are required to fill up the prescribed from and put it in an envelope, on which the applicant should mention the name of the post on the Right Hand side of the envelope in bold letters (i.e. Application for the post of Law Officer (Group- A))

The said application with request information and supporting documents, should be addressed to the Additional Director General of Police, Protection of Civil Rights, Maharashtra State, Mumbai D. D. Building 4th floor, Old Custom House, Fort, Mumbai **400 001. ( Attention- Desk Officer, Desk No. 41 )** and should reach this office on or before **06/10/2022** Application received after **06/10/2022** will not be entertained / considered. Applicants should also enclose two self addressed envelopes, along with their Application for correspondence.

Note- There may be change in the number / place of post shown above, competent Authority will have the powers to do so.

This Advertisement details and prescribed form are available on below mentioned websitt

www.mahapolice.gov.in

Scanned with CamScanner

**अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी "गट- अ" यांचे खालील पद कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.**

---

जाहिरात क्र. पोमसं/नाहसं/टे.क्र.१ वि.अ.भरती/४७/२०२२, मुंबई दि.२१ /०९/२०२२.

**अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील खाली दर्शविलेल्या ठिकाणी विधी अधिकारी "गट- अ" यांचे एक पद ११ महिने कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.**

**विधी अधिकारी "गट- अ" ( एकूण ०१ पद )**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | मंजूर पदे |
|---|---|---|
| | अपर पोलीस महासंसचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | ०१ |

उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज त्या सोबतच्या आवश्यक कागदपत्रांसह लिफाफ्यात घालुन लिफाफ्यावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात **विधी अधिकारी "गट- अ" च्या पदासाठी अर्ज** असे नमूद करून दि. ०६/१०/२०२२ पर्यंत अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, डी. डी. बिल्डींग, ४ था मजला, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ ( लक्षवेध :- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ४१) या पत्यावर सादर करावा. **दि. ०६/१०/२०२२ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.** अर्जासोबत पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

*** टिप :- वर दर्शविलेल्या पदसंख्येत / नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता असु शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.**

**सोबत : मासिक देय रक्कम, भत्ते, शैक्षणिक अर्हता, अनुभव वयोमर्यादा, कर्तव्य, जबाबदाऱ्या, अटी व शर्ती यांचा तपशिल आणि नमुना अर्ज.**

Scanned with CamScanner

**करारातील मासिक देय रक्कम :-**

**अ)** विधी अधिकारी गट- अ पदाकरिता करारातील मासिक देय रक्कम रू. ३०,०००/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रू. ५,०००/- असे एकूण रू. ३५,०००/- दरमहा देय राहील. ( उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत. ( शासन निर्णय, गृहविभाग क्र. डीपीपी-२०१४/प्र.क्र.०७/पोल-१०, दि. २१/०८/२०१८)

- **शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव :-**

  **१. शैक्षणिक अर्हता :-** उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असावा. तो सनदधारक असावा.

  **२. वयोमर्यादा :-**

  अ) विधी अधिकारी 'गट- अ' या पदासाठी उमेदवाराचे वय दि. ०६/१०/२०२२ रोजी ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे. किंवा

  **३.** जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान आहे त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान आहे अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

  **४. अनुभव :-**

  **अ)** विधी अधिकारी 'गट- अ' या पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

  **ब)** उमेदवारास गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक प्रशासकिय अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञान संपन्न असेल, ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

  **क)** उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेशे ज्ञान असेल.

- **कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

  १. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

  २. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व त्या संबंधीची प्रकरणे हाताळणे.

  ३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

  ४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

  ५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

  ६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

  ७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

  ८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य मदत करणे.

Scanned with CamScanner

- **अटी व शर्ती :-**

१. सदर पदाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी / अधिकारी गणले जाणार नाही.

२. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवळी ( जास्तीत जास्त ३ वेळा ११ महिन्याकरिता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिकारी यांचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल, व अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४. उमेदवाराची निवड लेखी परीक्षेद्वारे तसेच मुलाखतीद्वारे करण्यात येईल. परीक्षेचा तसाच मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

५. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

६. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा ( Agreement) करणे अनिवार्य राहील.

७. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८. उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दि. ०६/१०/२०२२ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

९. अर्जासोबत २.५ से.मी X २.५ से.मी. आकाराचे सद्याचे काढलेले २ रंगीत पासपोर्ट फोटो जोडावेत.

Scanned with CamScanner

### अर्जाचा नमुना

**विधी अधिकारी, 'गट- अ' पदाकरिता अर्ज**

कार्यालयीन उपयोगासाठी
१. अर्ज क्रमांक: ☐☐☐☐☐☐☐☐
२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक: ☐☐☐☐☐☐
३. अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह):----------

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाप्यात जोडावा.

**सूचना :** अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावे.

अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व # दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

**अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती :**

१. **अर्जदाचे संपूर्ण नाव:** आडनांव नांव वडीलांचे/ पतीचे नाव

मराठीत:______________________________

# इंग्रजीत : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

२. **पत्रव्यवहाराचा पत्ता :**

तालुका:______________ जिल्हा:________________ पीन कोड :☐☐☐☐☐☐

३. **कायमचा पत्ता:**

तालुका: जिल्हा: पीन कोड :☐☐☐☐☐☐

४. **दूरध्वनी क्रमांक-** लॅन्डलाईन ____________________ मोबाईल क्रमांक :

४A **ई-मेल:**

५. **जन्मदिनांक** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्मस्थळ: ________________

६. दिनांक ०६/१०/२०२२ रोजीचे वय: ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

७. लिंग: पुरूष ☐ / महिला ☐

८. धर्म:______________ जात:______________

९. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय? होय ☐ / नाही ☐

**योग्य असेल त्या ठिकाणी (✓) अशी खूण करावी.**

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती:

**१०. शैक्षणिक अर्हता:**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/ महाविद्यालय) | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १०वी) अथवा जूनी ११ वी परीक्षा. | | | | | |
| २.उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ. १२वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

११. **इतर शैक्षणिक अर्हता:**

संगणक प्रशिक्षित आहे काय ? **होय** ☐/ **नाही** ☐

१२. **अर्जदाराची इतर माहिती.**

अ) सनद घेतल्याचा दिनांक:

ब) अमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील:

* **टिप : वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

१३-अ. अर्जदारास यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/ स्थानबध्द करण्यात/ बध्द करण्यात/दंड करण्यात/ सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/ निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापिठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/ संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय? **होय** ☐ **नाही** ☐

१३-ब. हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापिठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात / संस्थेत अमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? **होय** ☐ / **नाही** ☐

( १३-अ किंवा १३-ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दती, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालय/ विद्यापीठ/ शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

** ** **

Scanned with CamScanner

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

मी श्री./सौ./कु. ______________________________ याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणिवपुर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/ नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

**ठिकाण:**

**दिनांक:**

अर्जदाराची सही

(दिनांकासह)

**सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.**

Scanned with CamScanner